**जिल्हा परिषदांतर्गत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभागातील वाहनांच्या इंधन, देखभाल व दुरुस्तीवरील खर्चासाठी ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या योजनांतर्गत तरतूदीमधून १% रक्कमेपर्यंत खर्च करण्यास परवानगी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००२/प्रक्र ६१३/पापु-०७
मंत्रालय,मुंबई-४०००२, दिनांक :- २८ ऑगस्ट २००२.

**परिपत्रक :**

जिल्हा परिषदांतर्गत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उप विभागातील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना शासकीय कामकाजासाठी देण्यात आलेल्या कार/जिप्स या वरील इंधनाच्या (पेट्रोल, तेल व वंगण इ.) खर्चासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी शासन **"२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता"** या मुख्य लेखाशिर्षांमधील पेट्रोल तेल व वंगण या बाबीअंतर्गत अनुदान देत आहे. परंतु मागील चार/पाच वर्षामध्ये या बाबीसाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभागातील वाहनांच्या इंधनासाठी पुरेसे अनुदान जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देता आले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदांमध्ये वाहनांच्या इंधन खर्चावरील, देखभाल व दुरुस्तीवरील बरीच देयके प्रलंबित असल्याची व त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याची विनंती जिल्हा परिषदांकडून वारंवार करण्यात येत आहे. तसेच यासाठी पुरेसे अनुदान अर्थसंकल्पात उपलब्ध होत नसल्यास, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या योजनांतर्गत तरतूदीमधून आकस्मिक/आस्थापना खर्चासाठी राखून ठेवण्यात येणा-या तरतूदीमधून काही रक्कम खर्च करण्यास परवानगी देण्याची विनंती ब-याच जिल्हा परिषदांनी केली आहे.

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे अदाजपत्रक तयार करताना त्यामध्ये योजनेवरील आकस्मिक/आस्थापना खर्चासाठी ५% तरतूद करण्यात येते. या ५% आकस्मिक/आस्थापना खर्चामध्ये योजनेसाठी लागणारी लेखनसामुग्री, वाहनांवरील खर्च व इतर अनुषगीक बाबींचा समावेश आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांच्याकडे

C:\ws07\VANKHEDE\cr301 20.8.2002.doc

असलेली वाहने ही या योजनांच्या कार्यान्वयानासाठी कार्यरत असल्याने या **वाहनांच्या इंधनावरील देखभाल व दुरुस्तीवरील खर्च या योजनांतर्गत तरतूदीमधून भागविण्यास शासन परवानगी देत आहे. तथापि वाहनांच्या इंधनावरील, देखभाल व दुरुस्तीवरील खर्चासाठी योजनांच्या अंदाजपत्रकात आकस्मिक/आस्थापना खर्चासाठी राखून ठेवण्यात आलेल्या ५% रक्कमेपैकी फक्त १% इतकीच रक्कम खर्च करण्यात यावी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
विभागीय आयुक्त सर्व
सर्व मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद
सदस्य सचिव ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र - १ /२, मुंबई नागपूर (लेखा परिक्षा)/(लेखा अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उपा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग (व्यय-३ व अर्थ-२०)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
निवड नस्ती कार्यासन क्रमांक पापु-०७.

C:\ws07\VANKHEDE\cr301 20.8.2002.doc